सन१९८२१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ६६
REFBK-0001957
REFBK-0001957

म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं.

...प्रसन्न ॥



# माझी जन्मभूमी.

लेखक,—

**दत्तात्रय श्रीधर कलचारी.**

आत्मोन्नति व भक्ति-मार्ग या पुस्तकांचे कर्ते.

REFBK-0001957
REFBK-0001957

आवृत्ति १ ली, प्रती १०००.

किंमत ३ आणे.

६ २४९
ॐ दा. क्र. १०५५

# " माझी जन्मभूमी. "

सान्द्रानन्द पयोदसौभगतनुं पीताम्बरं सुंदरं
पाणौ बाणशरासनं कटिलसत्तूणीरभारं वरम् ।
राजीवायतलोचनं धृतजटाजूटेन संशोभितं
सीतालक्ष्मणसंयुतं पथिगतं रामाभिरामं भजे ॥१॥

**अर्थः**—सांद्र आणि सुंदर अशा नीलमेघाप्रमाणें ज्याची शरीरकांती रमणीय आहे, ज्यानें पीतांबर धारण केला आहे, जो सौंदर्यशाली असून ज्याच्या हस्ताचे ठायीं चापबाण शोभत आहेत, ज्याच्या कमरेला उत्कृष्ट भाते विलसत आहेत, ज्याचे नेत्र दीर्घ असून कमलाप्रमाणें आहेत, मस्तकीं धारण केलेल्या जटाजूटांच्या भारानें जो अत्यंत शोभत आहे, असा **सीता** आणि **लक्ष्मण** यांचेसह मार्गस्थ असणारा जो सीता भिराम श्रीरामचंद्र त्यास मी भजतों.

लेखक,—दत्तात्रय श्रीधर कुळवारी.

सन १९२१.

# चार शब्द.

ह्या छोटेखानी पुस्तकाला वास्तवीक " **चार शब्द** " लिहि-ण्याची अवश्यकता नव्हती पण–हें **पणच** जिथें तिथें आडवें येत असल्यामुळें ते लिहीणें भाग पडत आहे.

वास्तवीक आपली अवनती आपण आपल्याच हातानें करून घेत आहोंत. आम्ही आपला आचार सोडला व विचाराच्या जोरावर प्रत्यहीं एक एक पाऊल अनीतीच्या गर्तेंत टाकीत आहोंत. पाऊल टाकतांना गर्तेंत असलेले कांटे आपणाला बोंचत नाहींत ह्मणून आपण आनंदानें त्या अनीतीला कवटाळून ती इतकी डोईजड करून ठेविली आहे कीं, तिच्यापुढें विचारांचे सुविचार लोपून–सुविचारांचे मार्ग मागें पडून, आपण सांप्रत उच्च सुबक व प्रेक्षणीय अशा कुविचा-राच्या–पण कलियुगांत सुविचारच वाटणाऱ्या अशा सिंहासनावर विराजमान झालेलें आहोंत. हा काळाचा महिमा आहे. त्यांत दोष कोणाकडेच नाहीं; पण त्यातलेंत्यांत–त्याच नरम व दिखाऊ सिंहास-नावरून उठण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो प्रयत्न करण्याकरितां चालू कलीयुगांत " ईश्वराच्या अस्तीत्वाचा साक्षात्कार " पुढें मांडणें व जनसमूहाचें लक्ष त्या साक्षात्काराकडे खेंचणें इष्ट वाटल्यामुळें आज हा माझा–तिसरा प्रयत्न आहे. हा प्रयत्न वाचकांना आवडल्यास मी माझ्या प्रयत्नाचें सार्थक मानीन.

हें पुस्तक छापण्याच्या कामीं माझ्या कांहीं मित्रांनीं मला मदत केली, त्याबद्दल मीं त्यांचा आभारी आहें. त्याचप्रमाणें माझे मित्र रा. रा. सदाशीव भास्कर पोतकर यांनीं माझी हस्तलिखीत प्रत पुन्हा प्रेसकरितां फेअर लिहिण्याची तसदी घेतली त्याबद्दलही मला त्यांचे आभार मानणें इष्ट आहे.

ही माझी तिसरी कृती—सर्वांनीं गोड करून घ्यावी व कांहीं सूचना असल्यास त्या खालील पत्त्यावर लेखकास कळवाव्या अशीं सर्वांना अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे.

शेवटीं रा. रा. कृष्णाजी विनायक सिनकर यांनीं अत्यंत थोड्या वेळांत पुस्तक सुबक छापवून दिल्याबद्दल व ठिकठिकाणीं कांहीं सूचना केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतों.

कानजी खेतशी
भाटीया चाल.
कांदेवाडी मुंबई.
१८-९-१९२१

द. श्री. कलवारी.

---

दत्तात्रय श्रीधर कलवारी

यांचें

नवीन पुस्तक

## पुनर्विवाह कीं प्रथमविवाह

लवकरच प्रसिद्ध होईल.

---

नं. २०१

# आनंदाश्रु.

' माझी जन्मभूमी " हें पुस्तक लिहिल्यानंतर थोड्याच

दिवसांत राजवाडी गांवांतील कांहीं उत्साही सद्-

गृहस्थांच्या खटपटीमुळें

श्रीसोमेश्वर प्रासादीक

" राजवाडी हितवर्धक समाज "

या संस्थेचें पाठबळ मिळालें, याबद्दल लेखकाला

आनंदाश्रु आल्यावांचून कसे राहतील ?

श्रीशंकरप्रसन्न.

# माझी जन्मभूमी.

सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत् ।
यद्भूतहितमत्यंतं एतत्सत्यं मतं मम ॥

शांतिपर्वांत सनत्कुमाराच्या आधारानें नारद शुकाला सांगत आहेत कीं, सत्य बोलणें हें योग्य व अवश्य खरें, पण त्याहीपेक्षां श्रेष्ठ जर कोणतें कार्य असेल तर ज्या गोष्टींत सर्व भूतांचें हित आहे, सर्व प्राणीमात्राचें कल्याण अमुक एका गोष्टीनें होईल असें आपलें मन आपणाला ग्वाही देत आहे—एका गोड भाषणानें उत्तम कार्य होईलच अशी आपली खात्री आहे ती गोष्ट—ती भाषा-ते शब्द-तें कार्य प्रत्येकानें करावें; ती गोष्ट प्रत्येकानें करावी व जें जास्त सोईस्कर वाटेल तेंच बोलावें. तें जरी असत्य असलें तरी त्याची महती बाळगूं नये. कारण, सर्व भूतांचें ज्यांत हित तेंच माझ्यामतें खरें सत्य होय.

श्रीतुलसीदासांनीं रामायणांत एके ठिकाणीं ह्मटलेलें आहे कीं, " भले आणि वाईट हेच सगळे ब्रह्मदेवानें उत्पन्न केले आहेत, आणि वेदांनीं त्याच्या गुणदोषांचें पृथक् पृथक् विवेचन केलें आहे. वेद, इतिहास आणि पुराणें हेंच प्रतिपादन करितात कीं, ब्रह्मदेवाची सृष्टी ही गुणावगुणांनीं परिपूर्ण भरलेली आहे. जसें सुखदुःख, पापपुण्य, दिवस रात्र, सज्जन दुर्जन, श्रेष्ठवर्ण व नीचवर्ण, अमृत विष, जन्म मृत्यु, ब्रह्म माया, जीव शीव, लक्ष अलक्ष, राजा रंक, काशी-मगध, ( येथील स्त्रियांच्या भ्रष्टतेची पुराणप्रसिद्धि आहे ) भागीरथी-कर्मनाशा, मारवाड-माळवा, ब्राह्मण-म्लेंच्छ, स्वर्ग-नरक, प्रेम विरक्ती; इत्यादि गुणदोषांचे विभाग वेद आणि शास्त्रें यांतच आहेत.

परमेश्वराच्या लीलेचें वर्णन करणें आणि त्याचें शब्दचित्र तंतोतंत रेखाटणें किती कठीण आहे, त्याची कल्पनाच मुळीं अत्यंत कल्पनातीत आहे.

आकाशांत अनंत तारका चमकत आहेत, ठराविक वेळीं सूर्यपरमात्मा जगाला आनंदी करीत आहे. प्रभातकाळीं उमललेलें सुंदर गुलाबाचें फूल, अत्यंत सुंदर, टवटवीत व मोहक दिसावें म्हणून परमेश्वराच्या लीलेचे दंव त्यावर पडत आहे व त्यायोगें जनसमूहाचें मन, आंगाला कांटे असून सुद्धां आपल्याकडे खेंचित आहे; परमेश्वरानें आपल्या संसारांत अशा कैक गोष्टी उत्पन्न करून ठेविल्या आहेत कीं, त्यांची कल्पना करतां करतांच जन्माची कहाणी कायमचीच बंद होते व कल्पना मात्र अत्यंत बळावते, केवढी उलाढाल ही ! असा सामर्थ्यवान् महात्मा जो जगत्सूत्रधार, त्याची एक एक कर्तबगारी, त्याचें एक एक अपत्य, त्याची ह्या मृत्युलोकांतील एक एक क्षेत्र वगैरे कल्पनेंत उतरलीं म्हणजे परमेश्वराचा संसार ही केवढी अजब चीज आहे ! इतकें असून सुद्धां आपण आपल्या कर्तबगारीबद्दल केवढी घमेंड मारतों व आपलें क्षुद्रपण कसें प्रगट करितों याची साक्ष प्रत्येकाचें मन प्रत्येकाला देतें.

मानवी पराक्रमाचा संसार जरी कितीही वाढला तरीपण त्याची बरोबरी विश्वाच्या संसारांतील एका कणाएवढी सुद्धां होणार नाहीं. विश्वसंसाराच्या कर्तृत्वाची आपल्या मनांत प्रखर भावना उत्पन्न होऊन ज्यावेळीं आपण किती पामर आहोंत याचा उलगडा आपणाला पडतो, त्यावेळीं हें विश्व उत्पन्न करणाऱ्या नटेश्वराची व त्याच्या अगाध कर्तृत्वाची—चटकदार वर्णनें ऐकून मनाला किती आनंद वाटतो; व त्याच्या बद्दल मनांत सहानुभूती कशी बाणते; ह्याचा गोड अनुभव प्रत्येकाला आहे. खरोखर किती आनंद होतो म्हणून सांगूं ? त्याच्या एक एक लीला—म्हणजे स्वर्गीय आनंद देणारें गवाक्षच !! ज्या परमेश्वरानें मानवी मनाच्या समाधानाकरितां अनेक प्रेक्षणीय स्थळें निर्माण केलीं, ज्या परमेश्वरानें—ठरावीकच वेळीं कमी

अधीक होणारें अचल-तीर्थ जो समुद्र तो उत्पन्न करून मानवी कल्पनेला सामर्थ्यचकीत करुन सोडिलें, ज्या जगन्नियंत्यानें हिमालयासारखे प्रेक्षणीय पर्वत निर्माण करून तोंडांत बोट घालावयाला लाविलें, जो आपल्या अस्तित्वाची प्रखर साक्ष " **चंद्र-सूर्य-तारका** " या रूपानें आज देत आहे, व सूर्याच्या प्रखर उजेडांत " **माझा संसार पहा** " अशी ग्वाही सर्व जगताला देऊन आपण नामानिराळा राहत आहे, अशा जगत्सूत्रधाराची आज्ञा न मानणें व आपल्याच करामतीचे पोवाडे गाणें ह्मणजे मूर्खपणाची कमाल होय. पण मूर्ख ह्मणण्याचा अधिकार तरी आह्माला काय आहे ? कारण ज्याला मूर्ख ह्मणावयाचें, त्याला त्या स्थितींतून वर काढणें हें जर श्रेष्ठ कर्तव्य होऊन बसतें; तर तसा प्रयत्न न करितां एकाद्या बोल घेवड्या मनुष्याप्रमाणें " तो मूर्ख आहे " असें ह्मणून भागेल काय ? नाहीं; आणि ह्मणूनच " **माझी जन्मभूमी** " ही आज आपल्या डोळ्यासमोर निरंतर विचार करिण्याकरितां ठेवित आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांत कितीतरी खेडीं आहेत, ही गोष्ट नवीन नाहीं, जर नवीन नाहीं तर रत्नागिरी जिल्ह्यांत पुष्कळ खेडीं आहेत ही गोष्ट सांगण्याचें कारण काय ? असा प्रश्न उत्पन्न होतो; पण ज्या ठिकाणीं ईश्वरनिर्मित चमत्कार सांगण्याचें मीं आज मनांत आणिलेलें आहे, त्या ठिकाणीं हीं खेडीं समाविष्ट झालींच पाहिजेत. कारण-खेड्यांतील शोभा-अर्थात् ईश्वरनिर्मित शोभा, बऱ्याच जणांस माहीत नसल्यामुळें--तीं खेडीं जरी परमेश्वरी अलंकारानें भूषित झालीं असलीं, तरी पण त्यांचें सौंदर्य आज अस्तमान होत चाललेलें आहे. अस्तमान होण्याचें कारण काय ? तें पर्यायानें पुढें कळेलच सबब त्याचा विस्तार तूर्त न होऊं देणेंच योग्य.

वरील जिल्ह्यांत असलेल्या खेड्यांपैकीं एका खेडेगांवीं माझा जन्म झाला. माझें जन्मठिकाण तुम्हाला सांगून-पुढें माझ्या जन्माची कहाणी तुम्हांला न सांगतां माझ्या जन्मठिकाणची कहाणी सांगण्याचा मीं प्रयत्न करणार आहें. पण प्रयत्न करणार आहें इतकें ऐकल्याबरोबर तुमच्या

मनांत एक अशी कल्पनेची लाट उसळेल कीं, जन्मठिकाणाची कहाणी सांगण्याचा हेतु काय ? कल्पनेची लाट रास्त आहे. पण त्याचें निराकरण कहाणी ऐकतांच होईल. परमेश्वरानें ज्या खेड्यांत मला जन्म दिला त्या खेड्यांचें नांव प्रथम न सांगतां, तें खेडें कोणत्या दैविक चमत्कारानें प्रसिद्धीला आलें व अशा प्रसिद्ध खेड्यांत माझा जन्म झाला ह्मणून मला आनंद झाला, तो दैविक चमत्कार प्रथम आपल्यापुढें ठेवितों. तत्पूर्वी मला स्पष्ट येथें नमूद करणें भाग पडतें कीं, नास्तिक लोक ह्या चमत्काराची हेटाळणी करतील त्यांच्या बथ्थड डोक्यांत वरील तऱ्हेचे विचार न शिवतां दैविक चमत्कार म्हणजे भोळ्या लोकांच्या अकलेचे तारे आहेत, असें ते पाश्चात् सप्रमाण विचारसरणीनें सिद्ध करतील, सबब त्यांचे विचार सत्य कीं असत्य हें न पाहतां त्यांना कोणत्याही तऱ्हेची ह्या आमच्या भावीक गोष्टीवर टीका करण्याची अगर तिला नांवें ठेवून–असत्य आहे असें ह्मणण्याची पूर्ण बंदी आहे; ह्या उपर जर त्यांनीं आपलें गरल बाहेर टाकलेंच तर त्याचा दर्प भाविकांना न लागतां त्याचा चटका नास्तिकांना बसेल हें त्यांनीं खुशाल समजावें.

ज्यावेळीं कैकयीनें श्रीरामचंद्राला वनवासाला धाडण्याला आपल्या पतीला भाग पाडिलें, त्यावेळीं पितृ–आज्ञा वंदनीय मानून, सापत्न मातेची इच्छा पूर्ण करण्याकरितां श्रीरामचंद्रानीं चौदा वर्षे वनवास भोगण्याचा पण केला. "तुह्मी वनांत जाऊं नका" अशी कळकळीची प्रजेचीं दीनवाणीनें निघणारीं वाक्यें श्रवण करूनहीं श्रीरामानें वनांत जाण्याचा बेत मुक्रर केला तो प्रसंग किती शोकजनक होता त्याची कल्पना "रामायण" वाचतांना होते. बापाची मृतवत् झालेली स्थिती, कौसल्येची दीनवाणी मुद्रा, अमात्य–प्रधान वगैरे सुतक्या सारखीं तोंडें घेऊन रागानें "कैकयीला" दोष देत असतांना श्रीरामचंद्रावर असलेल्या प्रेमानें त्यांच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या गंगा–यमुना, प्रजेची हृदयद्रावक स्थिती, महिला वर्गाचा हंबरडा, वगैरे वगैरे सर्व देखावा पाहून कोणाचीं आंतडीं–हुंदके येऊन स्वस्थ

वसतील. पण अशा प्रसंगाला न डगमगतां श्रीरामचंद्रांनीं प्रेमानें सर्वांचीं बोळवण करून आपला मार्ग–कैकयीच्या लाडक्या इच्छेला मोकळा केला. कैकयीला–आपल्या सापत्न मातेला–वाटणारा आपला कांटा–राज्यांतून पार घालवून दिला. त्यावेळीं त्याच्या बरोबर त्यांची पत्नी श्री **सीतादेवी** व त्यांचा सापत्न बंधु **लक्ष्मण** अशीं उभयतां त्यांच्या पाठीमागून गेलीं. ही त्रई रानांवनांतून कशी कशी गेली वगैरे हकीगत **रामायणांत** आहे. पण पुढील प्रसंग व त्याचा आजचा दाखला मीं आपल्या पुढें ठेविण्याची परवानगीं मागतों.

रानांवनांतून जातां जातां जेवढे ह्मणून साधू–संत होते त्या सर्वांनां भेटण्याचा श्रीरामचंद्रांनीं विचार केला व त्या प्रमाणें ते प्रत्येकाचें दर्शन घेत गेले. जातां जातां, त्यानां एकदम घाण आली. ही घाण कसली यांचा त्यांना विचार पडला; व ही तिन्ही मंडळी ही घाण कोणीकडून येते याचा तपास करूं लागलीं. तपास करितां करितां त्यांना एक गुहा मिळाली व तिच्या मुखांतून घाणीचा दर्प येतो हें त्यांनीं ठरविलें.

श्रीरामचंद्राच्या जागीं जर दुसरें कोणी असतें, तर ती घाण कां येते याचा तपास न करितां, त्या घाणीचा आपणांला संसर्ग नको म्हणून तो रस्ता सोडून निराळ्याच रस्त्यानें त्यानें यःपलायन केलें असतें, पण सज्जन जे असतात ते दुसऱ्याचें दुःख पाहून कळवळतात, ह्या प्रमाणें श्रीरामचंद्रांनीं ही घाण कसली, ती जर कोणा मनुष्याला येत असेल तर ती कां ? ह्याचा तपास काढण्याचा निश्चय केला व ती अमुकच ठिकाणाहून येते हें निश्चित केलें.

ह्या गुहेंत कोणीतरी मनुष्य असला पाहिजे व ही दुर्गंधी कोणा तरी मनुष्याच्या आंगाला येत असली पाहिजे. त्या दुर्गंधींपासून इतरांस त्रास होऊं नये म्हणून ह्या महात्म्यानें ह्या गुहेंत आपणांला कोंडून घेतलें असेल. हाय हाय ? किती पुण्यवान् महात्मा आहे !! आपल्या पासून दुसऱ्याला त्रास होईल ही पवित्र भावना मनांत

बाळगून ह्या ठिकाणीं कोण महात्मा बसला आहे. खरेंच त्याला ह्या संकटांतून मुक्त केलेंच पाहिजे.

वरील विचार मनांत धरून श्रीरामचंद्रांनीं त्या गुहेचें झांकण अर्थात् गुहेच्या तोंडावर असलेला मोठा धोंडा काढला, पाहतात तों काय ! आंतून जी दुर्गंधी एकदम आली त्या योगानें त्यानां एक क्षणसुद्धां उभें राहतां आलें नाहीं. तरी पण त्यांच्या मनांत दया उत्पन्न झाली. ह्या मनुष्याला ह्या संकटांतून मुक्त केल्याशिवाय आपण पुढें जावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. श्रीसीतादेवी व लक्ष्मण त्यांचाही कल त्याचप्रमाणें होता हें निराळें सांगण्याची अवश्यकता नाहीं.

ती सूर्योदयाची वेळ होती. गुहा डोंगरांत असल्यामुळें सूर्याचें कोवळें किरण त्या गुहेवर पडून, सुवर्णाची स्मृती पडत होती. सकाळची वेळ, सूर्याचें कोवळें किरण ! किती रमणीय देखावा तो ! ! त्या देखाव्याची कल्पना खेडयापाड्यांत राहणाऱ्या गरीब लोकानांच होय. त्याची कल्पना शहरांतील तुटपुंज्या जागेंत राहणाऱ्या आमच्यासारख्या भाग्यहीन मनुष्याला काय होय ?

शहरवासीयांनों, रागावलेत काय ? तुम्हांला भाग्यहीन म्हटलें म्हणून राग आला, पण खरोखर रागावण्याच्या पूर्वीं, एकदां खेड्यापाड्यांत जा. त्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या मनुष्याचें वैभव पहा. सकाळच्या राम प्रहरांत–सूर्याचें कोंवळें पडणारें ऊन, थंडीच्या दिवसांत त्या ठिकाणीं होपेला बसणारीं लहान लहान मुलेंबाळें, घरांत भरपूर जेवावयाला नसलें तरीपण त्यांच्या तोंडावर दिसणारी प्रसन्नता; वाड्यांत–गोठ्यांत, गाई–म्हशीचीं खिल्लारें, घरीं पावशेरच कां होईना–पण येणारें घरगुती दूध, वगैरे वगैरे किती गोष्टी तुम्हांला सांगूं, खरोखर–तुम्हीं किती जरी श्रीमंत धनवान् असलेत तरीपण सुदैवानें कधीं चुकून जर एकाद्या खेड्यांत गेलेत तर त्या गरीब–अन्नाला महाग असलेल्या खेडवळाची संपत्ती, हवीशी म्हणाल, व

आम्हीं शहरवासी भाग्यहीनच आहोंत यांची खात्री तुम्हांला पटेल. असो.

सकाळची वेळच इतकी चमत्कारिक आहे कीं दुष्ट मनुष्य सुष्ट बनतो, त्याचे गोड विचार त्यावेळीं उदय पावतात. नास्तिक मनुष्याच्या तोंडांत रामनाम येतें. मन शांत होतें व त्या शांत मनांत दैविक भावना खेळूं लागतात. माझ्या देशबंधूनो ! ह्याच रामप्रहरांत आपल्या मनाला योग्य वळण लावण्याचा अभ्यास केला पाहिजे. अशा रामप्रहरांत आपल्या अंगांत असणाऱ्या वाईट गुणांचा उच्चार करून उदय पावणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून " **कालच्या पेक्षां आज मीं पवित्रपणानें वागेन** " " **कालच्यापेक्षां मीं आज अधीक लोकोपयोगी कार्यं करीन**," अशी प्रतिज्ञा केली पाहिजे; आणि असें ज्यावेळीं आपण करूं त्याच वेळीं आपण आपलें कार्य केलें असें होईल, नाहींतर काय उपयोग ?

वर सांगितल्याप्रमाणें मंगलमय रामप्रहरांत प्रत्यक्ष श्रीरामप्रभु त्या गुहेच्या तोंडाजवळ उभे राहून–आंत डोकावून पाहात आहेत. अहाहा ! काय ती कांती ! ते पिळदार दंड, तो शामवर्ण, तेजस्वी चेहऱ्यावर सूर्यानें आपलें किरण टाकून अधिकच तेजस्वी केलेला चेहरा, छेः हें पाहून सीता देवीला दूर उभें राहवेना. त्यावेळीं तिनें दिराची भीति बाळगली नाहीं, दुर्गंधीची पर्वा धरली नाहीं. आंत असलेला कोणी दुर्गंधी प्राणी बाहेर आला तर तो काय ह्मणेल याचा सीतादेवीनें विचार केला नाहीं. तिला वाटलें–हा सूर्य कोण ? श्रीराम प्रभूच्या भाग्यशाली मुखावर निर्लज्जपणें विहार करणारा व माझ्या हक्काची पायमल्ली करणारा हा सूर्य कोण; छेः ती रामप्रभूजवळ आली. जवळ आली खरी, पण जर रामचंद्रांनीं विचारलें कीं, तूं कशाला या दुर्गंधींत आलीस, तर त्याला जबाब काय द्यावा; हा विचार तिला पडला; म्हणूनच कीं काय, प्रथम श्रीरामचंद्राचा हात धरून तिनें एकदम विचारलें " आंत कोण आहे; तें बाहेर कां येत नाहीं ? " हा प्रश्न ऐकतांच श्रीरामप्रभूला आनंद वाटला.

त्यावेळीं त्यानां असें वाटलें " जगांत माझ्या सारखा भाग्यवान् प्राणी कोण असेल काय ? " तो मंजूळ नाद ऐकतांच श्रीरामप्रभू मुदित झाले. ते म्हणाले:—

" सीते ! खरोखर ह्या रानावनांत तुझ्यासमवेत वास्तव्य करण्याला जितका मला आनंद वाटतो तितका आनंद छत्रचामरें माझ्यावर कितीही जरी ढळलीं तरीं मला वाटणार नाहीं. सीते ! निर्मळ प्रेम हीच खरी मृत्युलोकांतील संपत्ति, भिकार झोपडींत वास्तव्य करणाऱ्या दांपत्यांत जें प्रेम असतें, जी एकमेकांवरील एकमेकांची भावना असते, त्याच्या शतांशसुद्धां श्रीमंत, पैसा म्हणजे जीव कीं प्राण मानणाऱ्या सुखी प्राण्यांत नसते. हीच गरीबी व हाच वनवास मला निरंतर लाभो. पण त्या वनवासांत माझी ही हृदयदेवता मात्र माझ्याजवळ अवश्य पाहिजे. अशी निर्मळ आणि निर्हेतुक प्रेम करणारी देवी म्हणजे स्वर्गसौख्यच होय. पुढें कलियुगांत प्रेम म्हणजे पैसा होईल. कित्येक विद्वान् आपल्या पत्नीचा हात आपल्या हातांत धरून तिला कुमार्गाकडे लावतील, व येणाऱ्या पैशावर आपलें पोट व आपले ऐषआराम छाती पुढें काढून भागवतील. पण त्यांना एवढेंसुद्धां कळणार नाहीं, कीं तुमची भाग्याची लक्ष्मी-अवदसेच्या छत्रचामरांत वावरूं देतां, या योगानें अवदसेच्या राज्यांत मिळविलेल्या पैशांच्या राशींत, तुमच्या भाग्याच्या राशी जळून खाक होतील. व त्यामुळें, हजारों पांढरे पापड घरांत येऊन पडले तरी तुम्हीं जन्माचे भिकारी ते भिकारीच रहाल. सीते, तुला काय सांगूं ! हे लहान लहान आश्रम, या शेतकऱ्यांच्या दूर दिसणाऱ्या भिकार झोंपड्या, ह्यांत जी लक्ष्मी आहे, ह्यांत जें सौख्य आहे, त्या तऱ्हेचें सौख्य जगांत दिसणाऱ्या उंच हवेल्यांत आजसुद्धां नाहीं तर पुढें कलियुगांत कुठें मिळेल ह्याची खात्री मी तुला नंतर करून देईन, व ह्या जगांत कोणत्या तऱ्हेचे कसे कसे लोक आहेत व होतील ह्याची माहिती सांगेन. पण—

" महाराज, पण बिण कांहीं नको, आपण आनंदांत आहोंत,

आणि ह्या गुहेंत राहणारा गरीब बिचारा आपला बंधू-आपल्या आंगाला घाण येत आहे, ह्मणून बाहेर येण्याला कांकू करीत आहे, सबब त्याला बाहेर आणून त्याचें दुःख निवारण करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. म्हणून महाराज त्याला बाहेर बोलवा व त्यांचें दुःख ऐकून तें निवारण करा."

श्रीरामचंद्र एकदम मनांत उमजले व निष्कारण इतका वेळ फुकट दवडला ह्मणून त्यांना वाईट वाटलें. आपल्या धर्मपत्नीनें आपणांला जागें केलें व आपलें कर्तव्य काय हें जाणविलें. श्रीरामचंद्रजी एकदम ह्मणाले " शाबास, एवढ्याचकरितां **प्रत्येक मनुष्यानें ही धर्मपत्नीची बिडी अडकवून घेतलीच पाहिजे.** कारण आपल्या प्रेमळ शब्दानें आपल्या नवऱ्याला ताळ्यावर कसा आणावा व त्याच्या चुकीचें माप त्याच्या पदरांत घालून त्या चुकी पासून त्याला परावृत्त कसें करावें हें तिलाच चांगलें समजतें, आणि आश्चर्य हें कीं, शब्दानें थोबाडांत मारून सुद्धां तिचा त्याला राग येत नाहीं. उलट आनदच मानतो." इतकें बोलून ते गुहेकडे वळले व आंत डोकावून पाहूं लागले; दुर्गंधीनें त्यांचें डोकें भणाणून गेलें. पण कर्तव्यापुढें त्याची क्षिती त्यांनीं बाळगली नाहीं. त्यांनीं एकदां, दोनदां—आंतल्या मनुष्याला हांक मारली. तरीही पण कोणी बाहेर ज्यावेळीं येईना, त्या वेळीं ते एकदम म्हणाले " आंत कोण असेल, त्यानें एकदम बाहेर यावें. घाणीची पर्वा न करितां—आपली घाण दुसऱ्याला येईल या भावनेनें वेळ फुकट न घालवितां-एकदम बाहेर येण्याची त्वरा करावी.

ही अधिकारयुक्त वाणी ऐकतांच आंतील मनुष्याला स्वस्थ कसें बसवेल. तो हळूहळू बाहेर येऊं लागला. त्याला वाटलें, ज्या अर्थीं अधिकारानें आपणांस कोणी बाहेर बोलावीत आहे, त्याअर्थीं आज आपले भाग्याचे दिवस खास येणार ! आंतील मनुष्य हळुहळु बाहेर येऊं लागला. जों जों तो बाहेर येऊं लागला, तों तों घाण अधिक येऊं लागली. सीतेनें आपल्या आंगावरील पिवळ्या वस्त्राचा पदर

नाकाला लावला. श्रीरामचंद्रानें आपलें नाक डाव्या हाताच्या दोन बोटांनीं धरिलें. बिचारा लक्ष्मण लांब होता. कारण ' राम—सीता ' जवळ जवळ असलीं ह्मणजे कांहींतरी निमित्त काढून तो दूर होत असे. असो.

आंतील दुर्दैवी प्राणी बाहेर आला. त्याच्या आंगांतील घाणीला जणूं काय ऊतच आला होता. अनिवार घाणीमुळें श्रीरामचंद्रजी सीतेसमवेत चार पावलें दूर सरले. दूर सरलेले पाहून बाहेर येणाऱ्या मनुष्यानें तेथेंच उभें राहून श्रीरामचंद्रजीच्या मुखाकडे पाहिलें. आपल्याला अधिकारानें हांक मारून बाहेर येण्याची आज्ञा करणारा हा कोणीतरी राजपुरुष असला पाहिजे. कोणी कां असेना; पण ज्याअर्थीं त्यानें आपणांला बाहेर बोलाविलें आहे त्या अर्थीं त्याच्या पुढें जाऊन वयानें जरी लहान असला तरी त्याला वंदन केलें पाहिजे. पण तो ज्याअर्थीं चार पावलें दूर सरला आहे त्याअर्थीं आपण याच ठिकाणीं उभें राहून दूरूनच वंदन केलेलें बरें. असा विचार मनांत येऊन त्याच ठिकाणीं उभें राहून, त्या दुर्दैवी व दुर्गंधीनें युक्त अशा प्राण्यानें श्रीरामचंद्रजीनां दूरूनच वंदन केलें व मला कां बाहेर बोलाविलें असें त्यानें अत्यंत नम्रतापूर्वक विचारलें.

रामचंद्रजी म्हणाले:—आपली अशी स्थिती होण्याचें कारण काय ? आपला चेहरा तर अत्यंत तेजस्वी दिसत आहे, जणूं काय आपण कोणीतरी महा तपस्वी असले पाहिजेत. पण चेहरा सोडून जर आपलें सर्व आंग पाहिलें तर तें अत्यंत दुर्गंधीनें युक्त असें आहे. महाराज ! आपली अशी स्थिती होण्याचें कारण काय बरें ? ”

“काय सांगूं—आपण कोणीतरी राजपुत्र आहां अशी आपली तेजस्वी मुद्रा मला ग्वाही देत आहे. पण—आपल्यापासून माझें दुःख निवारण होईल असें माझें मन मला सांगत नाहीं. त्यांतून माझा सर्व इतिहास जर मी आपल्याला सांगूं लागलों तर तो अत्यंत दुर्गंधीनें युक्त असा आहे. सबब त्याचा पाढा मीं आपल्यापुढें वाचूं इच्छित नाहीं. ”

' कारण काय ? ' रामचंद्रजीनें उत्कंठेनें विचारलें.

(॥१ मार्च २९७

' कारण काय ? ' होय, प्रश्न बरोबर आहे. त्याचें उत्तरही कठीण नाहीं. कारण इतकेंच कीं, या सत्ययुगांत माझ्यासारखा पापी मीच, आणि असें आहे ह्मणून माझ्या पापाचा पाढा जर मीं आपल्यापुढें वाचला तर उपयोग कांहीं होणार नाहीं, त्यांतून दाता पाहून दान मागावें लागतें. तसेंच, महाराज ! माझें पाप ऐकणाऱ्या मनुष्यानें माझी ही दुर्गंधी नाहींशी केली पाहिजे. नाहींतर उपयोग काय ? माझ्या पापाचा पाढा आपण ऐकाल आणि " **केलेल्या पापांचीं फळें भोगतोस** " असें ह्मणत आपला रस्ता सुधाराल. सबब आपणांला माझी अशी विनंती आहे, कीं, आपण मला दर्शन दिलेंत व कळवळ्यानें माझें आपण दर्शन घेतलेंत हेंच मीं माझें भाग्य समजतों. सबब आपण जा. या दुर्गंधींत तिष्ठत उभे राहूं नका. कारण माझें दर्शन ह्मणजे साक्षात् नर्कवास होय; माझ्या पापाचीं फळे मला मिळत आहेत. आपण त्याच्या संगतीलाही उभें राहूं नये हेंच योग्य. सकाळच्या रामप्रहरांत–आपण मला दर्शन दिलेंत हेच माझ्यावर मोठे उपकार आहेत. ही आपली धर्मपत्नी वाटते, खरोखरच आपण भाग्यशाली आहांत. हिचा चेहरा राजवैभवांत वाढलेला दिसतो. तिलाही पण ह्या घाणींत उभें राहूं देऊं नका. "

" आपली हकीगत आह्मांला सांगा, आपणांला ह्या त्रासांतून शक्य तितक्या लवकर मुक्त करण्याचा आम्ही प्रयत्न करूं. कारण आपणांला हे जे क्लेश प्राप्त झालेले आहेत, ते अत्यंत दुःसह आहेत, सबब त्याचें निवारण करणें आमचें काम आहे. सीता देवींनें अत्यंत कळकळीनें सांगितलें.

काय ह्मणालांत—तुमच्या आंगांत माझें पाप नाहींसें करण्याची शक्ति आहे ? सानंद आश्चर्यानें त्यानें विचारलें. राम एकदम ह्मणाले " तुमचे हाल माझ्यानें पाहवत नाहींत. आणि तुह्मांला या हालांत ठेवून माझ्यानें एक पाऊल पुढें टाकवत नाहीं. म्हणूनच मीं पुन्हां तुह्मांला सांगतों कीं, आपली हकीगत सांगा. "

" माझी हकीगत आपण ऐकून—मीं भयंकर पापी आहें असें ह्मणाल व मला दुःखमुक्त न करितां " **पापाचीं फळें भोगूंदे** " असें ह्मणत आपण जाल. मग पुढें मीं काय करूं ? " आपला जर शब्दावर विश्वास असेल—तर मीं तुह्मांला या माझ्या—धर्म—पत्नीला साक्षी ठेवून सांगतो कीं, मीं आपणांला या दुर्गंधीपासून मुक्त करीन. आणि जर माझ्या शक्तीच्या बाहेर तें काम असेल तर मी आपल्या जवळ या पत्नी—समवेत—व त्याप्रमाणें तो पहा—माझा आवडता व माझ्यावर जीवापलीकडे प्रेम करणारा माझा भाऊ—लक्ष्मण, अशीं तिघें आपण रोगमुक्त होईपर्यंत राहूं: मग तर आपली कांहीं हरकत नाहींना ! " दशरथ राजाचा मुलगा—लक्ष्मण काय ? " त्या दुर्दैवी प्राण्यानें उत्कंठेनें विचारलें. होय महाराज—मीहीपण त्यांचाच जेष्ठ चिरंजीव; मला रामचंद्र ह्मणतात, ही माझी धर्मपत्नी—जनक राजाची मुलगी, हिला सीता ह्मणतात. काय ह्मणालांत, तुम्हीं प्रत्यक्ष श्रीराम-प्रभू! किती भाग्याचा मीं, आपण इतक्या लवकर इकडे याल ही माझी कल्पनाच नाहीं. " " म्हणजे—मीं येणार होतों हें आपणांला कसें कळलें ? " श्रीरामचंद्रांनीं विचारलें.

" आपण इकडे येणार हें मला माझ्या हितकर्त्यानें—"

" आपला हितकर्ता कोण ? "

" माझा हितकर्ता—तो पहा. " खालीं सपाटीवर असलेल्या श्री शंकराच्या पिंडीकडे बोट करून तो प्राणी ह्मणाला.

" साक्षात् श्रीशंकर जर तुमचे हितकर्ते आहेत—तर आपण अद्याप रोगमुक्त कां झाले नाहींत? "

" मीं रोगमुक्त होण्यास—आपली आवश्यकता होती ह्मणून. "

" माझी आवश्यकता आणि ती कशी काय ? "

" महाराज—आपल्याच हातून मी रोगमुक्त होणार असल्या-कारणानें माझी सर्व हकीगत आपल्यापुढें मांडतों. पण थोडक्यांत मांडतों. कारण माझी दुर्गंधी मला किती तरी त्रास देते. मग ती आपल्याला व आपल्या प्रिय पत्नीला किती जाणवत असेल. याची

कल्पना मला आहे. माझी हकीगत ऐकतांना तिरस्कार दर्शवूं नका. मी माझी हकीगत अगदीं थोडक्या वेळांत आटपतों. माझें पाप व त्याचा पाढा मीं तुमच्याजवळ वाचला ह्मणजे माझें भारावलेलें हृदय थोडें हलकें होईल; व पाप निवारण करणाऱ्या महात्म्याजवळ सर्व ओकलों–कांहीं लपवून ठेविलें नाहीं ह्मणून समाधान वाटेल. ऐका; माझी सर्व हकीगत ऐका: —

मीं जरी मोठ्या श्रीमंत कुटुंबांत जन्माला आलों नसलों तरी पण एका कुलीन, अन्नवस्त्राला महाग नसलेल्या कुटुंबांत जन्मलों. माझे दुसरे दोन भाऊ आहेत. आमच्या वडिलांचा कित्ता असा होता कीं, वयांत आल्यावर प्रत्येकानें आपआपलें पोट भरावें. घरांत एकटा कोणी तरी राहून बाकी सर्वांनीं आपआपलीं पोटें भरावीं, त्याप्रमाणें माझा वडील भाऊ घरांत राहिला व मीं व माझे दुसरे भाऊ असे रोजगाराला बाहेर पडलों. बाहेर पडल्यानंतर अर्थात् आह्मीं दोघेही भाऊ निरनिराळे झालों. दरवर्षाला एकदां सर्वांनीं घरीं यावें व आह्मांला भेटावें अशी उभयतांना आमच्या वडीलांची आज्ञा होती. असो. सर्व हकीगतीशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें मीं माझीच थोडक्यांत हकीगत आपल्यापुढें ठेवितों.

माझ्या वयाच्या सतराव्या वर्षी मी घराच्या बाहेर पडलों, बाहेर पडलों त्यावेळीं मीं अत्यंत निर्मळ मनाचा होतों, पण पुढें श्रीमंत लोक चैनीमध्यें वागत असलेले पाहून, आपणांलाही त्याचप्रमाणें वागावयाला मिळेल तर बरें, हीच भावना माझ्या मनांत रात्रंदिवस घोळूं लागली. महिन्याचे कांठीं पांच पंचवीस रुपयें मला मिळूं लागले होते, पण ते मला अपुरे पडूं लागले. माझा खर्च अतीशय वाढला. त्यावेळीं जर मीं व्यवस्थेशीर रीतीनें वागलों असतों तर दहा बारा रुपये माझ्या एकट्याच्या खर्चाला पुरे झाले असते. पण मला सांगण्याला अतीशय वाईट वाटतें कीं, मीं माझ्या पाठीमागें एक शुक्रकाष्ठ लावून घेतलें होतें. ती बाई अत्यंत गरीब असावी अशी माझी खात्री होती. सांगायाला मोठी शरम वाटते कीं, ती स्वरूपानें

चांगली नव्हती, पण निर्मळ मनाची व निर्हेतुक प्रेम करणारी आहे अशी माझी त्यावेळीं खात्री झाली. पुढें मीं तिच्या संगतींत राहूं लागलों. तीही पण इमानें इतबारें माझ्याशीं वागत होती. ह्या गोष्टीला तीन चार वर्षें झालीं. या तीनचार वर्षांच्या अवधींत मीं माझ्या पित्याला अगर मातेला एकवेळही भेटावयास गेलों नाहीं. त्यांचीं पत्रावर पत्रें येत होतीं. मीही पण त्यांना चांगल्या तऱ्हेचीं पत्रें पाठवीत असें. त्या योगानें त्यांना वाटे कीं, "शाबास—हा माझा नशीबवान् मुलगा आहे खरा." पण माझी स्थिती इतकी चमत्कारिक होती कीं, मला स्वताला माझें वेतन पुरत नसे. माझा वाढता खर्च चैनीनें अधीकच वाढूं लागला होता. पैसा पुरला नाहीं—आणि बहुधा असें दर महिन्याला होत असे—ह्मणजे मीं माझ्या आंगवस्त्राजवळ दांत विचकीत असें व तीहीं पण माझें कौतुक पुरवीत असे.

असें होतां होतां एका सकाळीं एक पत्र आलें व त्यांत मला माझ्या वडिलांनीं अत्यंत घाईनें बोलाविलें होतें. मलाही पण एकदां जावेंसें वाटत होतें. त्याप्रमाणें मीं जाण्याचा बेत केला, मला माझें वेतन पुरेसें नसल्यामुळें मी त्यांत वाढ करण्याबद्दल वरिष्ठाशीं बरीच घासघीस घालीत असे. पण त्यांनीं त्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष्य केलें होतें. त्यावेळेपासून माझें नोकरीवरचें मन उडालें होतें अर्थात् आज पत्र अनायासेंच आलें आहे. सबब "पगार वाढवा" नाहींतर मीं नोकरी सोडितों ही दशहत वरिष्ठांना घालावयाची, असा मीं बेत केला. त्याप्रमाणें माझा विचार मीं माझ्या अंगवस्त्राला सांगितला. तिच्याकडूनही संमती मिळाली अर्थात् मला आनंद झाला.

नेहमींप्रमाणें कामावर जाऊन रुजू झालों. माझे वरिष्ठ कामांत नाहींत असें पाहून मीं त्यांच्याजवळ माझें वेतन मला पुरत नाहीं असें मोठ्या दीनवाणीनें सांगितलें. त्यानींही पण ऐकलें व "आणखी दोन महिन्यांनीं मी आपलें वेतन वाढवीन. तुह्मी कामाला लागा." असा त्यांनीं मला विश्वास दाखविला. पण मला मुळीं नोकरीच करणें जर आवडत नव्हतें तर ही मुदत कुठची आवडणार! अर्थात्

मीं माझें डोकें फिरविलें व माझें वेतन आजपासून वाढवा, नाहीं तर मीं जातों.

ह्या माझ्या अरेरावीपणाचा परिणाम अनिष्ट, पण मला इष्टच झाला व लगेच माझा पगार चुकता करून माझी नोकरीवरून सुटका झाली.

झालें. भरीला थोडेसे पैसे घरांत मागून मी माझ्या घरीं गेलों. गेलों तों काय, माझे सर्व भाऊ मला भेटले. माझा एकंदर रुबाब पाहातांच सर्व थक्कच झाले. "शाबास, हा मात्र नशीबवान् खरा" असे उद्गार आईपासून घरांत सर्वांच्या तोंडांत एकदम आले व मलाही थोडेंसे समाधान वाटलें.

त्याचवर्षीं आमच्या वडिलांनीं आह्मां तिघां भावांचीं लग्नें केलीं. माझा एकंदर थाट पाहून-मला चांगल्या चांगल्या मुली सांगून आल्या व सुदैवानें माझ्या पदरीं सौंदर्यवान् अशी एका गर्भश्रीमंताची मुलगी पडली व मीं चतुर्भुज झालों. माझ्या पत्नीचें वय त्यावेळीं अल्प होतें ह्मणून लग्नसमारंभ पार पडल्यानंतर माझ्या श्वशुरानें आपल्या बरोबर तिला आपल्याकडे नेली.

झालें. मीं माझा मोठेपणा सर्वांना सांगूं लागलों. आईला मोठमोठ्या थापा दिल्या. माझा **तिकडे कोण मान आहे** वगैरे वगैरे मोठमोठ्या गोष्टी सांगून मीं वडिलांनाही थक्क केलें. लोकांना तर काय ? कपडे, लत्ते वगैरे वगैरे सर्व पाहून माझ्याकडे जो तो पाहूं लागे. मला वाटे-श्रीरामप्रभु, माझ्यावर रागावूं नका, मीं खरी हकीगत सांगतों ती शांतपणें ऐका,-सांगतां सांगतां एक मोठा दुःखाचा सुस्कारा टाकून तो दुर्दैवी प्राणी आपला इतिहास पुढें सांगूं लागला-"मला वाटे-प्रत्येक तरूण स्त्रीनें माझ्याकडे पाहावें, माझ्याजवळ बोलावें-माझ्याकडे पाहून हंसावें, ही भावना मनांत वारंवार घोळूं लागली व त्याप्रमाणें मीं वागूं लागलों. अर्थात् कांहीं ठिकाणीं मला अपयश मिळे व कांहीं ठिकाणीं मी विजयी होई. असें वागतां वागतां

मीं ह्मणजे **कोणीतरी आहें** व सर्वांनीं माझ्या आज्ञेंत वागलें पाहिजे असें मला वाटूं लागलें.

पुढें कांहीं दिवसांनीं—माझी रजा संपली अशी थाप मारून मीं घरून परत मूळच्या ठिकाणीं आलों. माझी आवडती असौंदर्यसंपन्न पण गुणी व एकनिष्ठेनें प्रेम करणारी " ठकी "—तिला ठकी असें ह्मणत असत—माझी वाटच पाहात होती. मी परत आलेला पाहून तिला आनंद झाला.

झालें, नोकरी नाहीं, नोकरी पाहणेंही मला पसंत वाटत नसे खाणेंपिणें व रिकामटेकडे भपक्यांत हिंडणें हीच माझी नोकरी असें मला वाटूं लागलें. कारण अशा नोकरीनें एकतर ठकीजवळ सर्व दिवस बसण्याला रिकामपण मिळत असे व माझा सर्व खर्च तीच पुरवीत असे. मला त्यावेळीं असें वाटे कीं, ठकीजवळ पैसा बराच असला पाहिजे.

हळु हळु माझी स्वतंत्र असलेली जागा मीं सोडली व सर्व सामानासह ठकीकडे आलों. तिलाही आनंद वाटला. तिला कोणीच नव्हतें, अर्थात् ठकीकडे जेवण वगैरे सर्व कांहीं यथास्थित उरकीत असें. जगांत प्रतिष्ठितपणें मिरवायाचें, लोकांना लांब लांब बाता झोंकावयाच्या. आपण कांहीं एक काम न करितां—एक पैही न मिळवितां ठकीच्या—ह्मणजे **बायकांच्या जीवावर हें पोट जाळायचें** व चैनींत फिरायचें, माझा हा धंदा आहे.—तो धंदा मीं करितों वगैरे वगैरे लांब लांब बाता झोंकून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकावयाची हीच माझी कामगिरी—हाच माझा धंदा व हीच माझी हें पोट जाळण्याची क्लृप्ती !

झालें; दिवसामागून दिवस, वर्षांमागून वर्षें जाऊं लागलीं. असा एक दिवस उजाडला कीं, त्या दिवशीं सकाळीं उजाडण्याच्यापूर्वीं माझी प्रियपत्नी आपल्या बंधूसमवेत आली; व आपल्या लावण्य मनोहर दर्शनानें तिनें मला सुखी केलें. आहाहा ! काय तें लावण्य ! त्या प्रकारचें लावण्य मला मुळींच पाहावयाला मिळालें नव्हतें. मीं

माझ्या मेहुण्याचा योग्य आदरसत्कार करून–त्याला दहा पंधरा दिवस ठेवून घेऊन बडेजावीनें त्याला निरोप दिला.

माझ्या पत्नीकडे पाहून मला जितकें–त्याच्याही पलीकडे ठकीला तिचें स्वरूप पाहून सौख्य झालें. माझी कल्पना चुकली. माझी कल्पना होती कीं, घरांत आतां भांडणें चालू होतील. पण उलटाच प्रकार, उलट ठकी माझ्या पत्नीची जितकी काळजी घेत होती; त्याप्रकारची काळजी प्रत्यक्ष तिची आई घेत नव्हती असें स्वतः माझी पत्नीच कबूल करीत असे.

पांच सहा महिन्यांत माझी पत्नी व माझी ठकी म्हणजे नमुनेदार प्रेमाचें सरोवरच झालें. त्यासरोवरांत मी मोठ्या आनंदानें पोहत होतों. लोक मला नांवें ठेवित होते. पण माझ्यापुढें मात्र मला चांगलेंच ह्मणत असत.

ठकीनें माझी व माझ्या पत्नीची कोणत्याही तऱ्हेची उणीव होऊं दिली नाहीं. ठकी कोण हा प्रश्न मीं माझ्या पत्नीजवळ केव्हांच सोड-विला होता. ती माझ्या गांवची एका गरीबाची मुलगी आहे व माझ्या आश्रयानें ती ह्या ठिकाणीं राहात आहे. आपलें सर्व काम घाम आनंदानें करील व सुखानें राहील. हें बिच्याऱ्या भोळ्या—जगांत अगदीं सरळपणें व्यवहार चालत असतात ही जाणीव असलेल्या—त्या गरीब सौंदर्यसंपन्न लतिकेला खरें वाटलें व तीही पण गप्प बसली.

पुढें थोड्याच दिवसांनीं ठकीचें रडगाणें सुरु झालें. पैसा जवळ नाहीं ही रड चालू झाली. पण मीं तरी काय करणार ? माझा किर-कोळ खर्च जर तीच चालवीत होती, तर मीतरी तिला काय सांगू ? नोकरी करणें व आपल्या स्वतंत्र वृत्तीला बांध घालणें माझ्या अगदीं जिवावर आलें. पुढें-पुढें काय ? ठकी हुशारच, माझी चैन चालवि-ण्यास एक सोपी युक्ति तिनें मला सांगितली. ती मला प्रथम मान्य झाली नाहीं. पण ती युक्ति, श्रीरामचंद्रजी, ती युक्ति मी मान्य केली, मला पटली व त्याच योगानें ही माझी दुर्गंधी आज सर्व जगां-

तून मला उठवून, अशा खपदाडांत बसावयाला लावीत आहे. माझ्या जिवाचा सत्यनाश, अब्रूचा सत्यनाश, माझ्या आप्त बांधवांच्या प्रेमांचा सत्यनाश. हचि एक गोष्ट, त्या सटवीनें माझ्या मागें लाविली व मला जगांतून काळें तोंड करण्याची पाळी आणिली. पण तिला तरी मी दोष काय म्हणून देऊं ? बोलतां बोलतां त्याचा राग अनावर झाला, डोळे खदिरांगारासारखे लाल झाले. त्वेषानें त्याच्या तोंडून शब्द फुटेना. पण मनाचा हिय्या धरून पुढें बोलण्याचा त्यानें प्रयत्न केला.

श्रीरामचंद्र व सीता अशीं उभयतां त्याची काहणी लक्ष देऊन ऐकत होती. इतक्यांत लक्ष्मणही " काय हकीगत आहे " ती ऐकण्यास तेथें आला.

त्यानें आपली कहाणी पुढें सांगण्याचें चालू केलें. तो ह्मणाला " त्या सटवीनें मला सांगितलें—काय सांगितलें ? पण कशाला मीं तिचे शब्द तुह्मांला सांगूं ? महाराज, ते अपवित्र शब्द न सांगतां, मी त्रोटक हकीगत सांगून मी माझी हकीगत पूर्ण करितों. माझा चरितार्थ—माझा बडेजाव, माझ्या पत्नीचें सौंदर्य चालवूं लागलें. श्रीमंत, विद्वानांत मोडणारे बडे बडे लोक माझ्याशीं ओळख करूं लागले. थोडक्याच दिवसांत मीं बडा श्रीमंत झालों. बडे बडे लोक माझ्यामागें हांजी हांजी करूं लागले. माझी कोणत्याही प्रकारचीं कामें सहज होऊं लागलीं. अशा तऱ्हेनें मीं ऐदी श्रीमंत—बायकांच्या जिवावर पोट भरणारा—स्वताच्या प्रतिष्ठितपणाचा टेंबा जगांत मिरविण्याची हांव बाळगून विद्वान्, जगांत लौकिकवान् ठरलेल्या बड्या बड्या लोकांबरोबर मीं मिरवूं लागलों व मला त्यांत यशही आलें.

पुढें कांहींएक कारणामुळें—मीं स्वतंत्र-ठकीला सोडून—पत्नीसह निराळा राहूं लागलों; व आपला संसार ह्मणजे एक नमुनेदार महाल केला. करण्याला काय अडचण पडणार ! महाराज! मीं माझ्या पत्नीला सांगत असें, अमका आला ह्मणजे त्याला हें सांग; तमका आला

ह्मणजे त्याला तें आणण्याला सांग अशा तऱ्हेनें ती माझी प्रत्येक आज्ञा पाळीत असे.

काय सांगूं महाराज ! मला जसा पवित्रपणाचा विधिनिषेध वाटेनासा झाला होता, त्याचप्रमाणें माझ्या पत्नीला सुद्धां कसल्याच गोष्टीचा वीट येईनासा झाला. कोणीं कां असेना, त्या ठिकाणीं जातीचा निर्बंध नाहीं, पण फक्त–श्रीमंत पाहिजे. नामांकित, विद्वान् व श्रीमंतीनें पुढारी झालेले कैक माझ्याशीं दोन शब्द बोलावयाला मिळतील ह्मणून वाट पाहात असत; आणि मीही पण अगळपगळ त्यांच्याशीं बोलत असें.

होतां होतां माझ्याकडे, माझ्या घराची व सासुरवाडीची मंडळीं येऊं लागली. तीं माझा संसार, टापटीप, बडेजाव, आला गेला, पाहून आनंदीत होत असत. त्यांनाही पण वारंवार पैसा देऊन, पाण्यासारखा पैसा खर्च करून तोंडांत बोटें घालावयाला लावीत असें. माझी बायकोही पण माझी अब्रू संरक्षण करिण्याकरितां एक ब्रही माझ्या विरुद्ध न बोलतां, सज्जनपणानें, मर्यादितपणानें वागत असे. खरी साध्वी तीच असें मला म्हणावें लागतें.

केव्हांना केव्हां तरी पापाचा घडा हा फुटावयाचाच; त्याप्रमाणें लोक आपापसांत कुजबुजूं लागले, हळुहळु माझे बांधव माझ्याकडे येतनासे झाले. आले तर आले, नाहींतर नाहीं, अशा स्थितींत बरेच दिवस गेले.

एके दिवशीं मीं मोठ्या पहांटेस उठून बाहेर गेलों होतों. कांहीं महत्वाचें काम नव्हतें–पण जाणें अवश्य होतें. तें काम करून परत आलों आणि पहातों तों काय ! महाराज, माझी पत्नी आणि माझ्या घरांत काम करणारा गडी यांची थट्टामस्करी चाललेली. मला तें सहन झालें नाहीं. गडी पळाला, पण माझी पत्नी न घाबरतां उभी राहिली. मीं एकदम चवताळलों, पण तिनें हळु शब्दांत सांगितलें " आपण कां रागावतां ? तुमचें व माझें पोट भरण्याचें सामर्थ्य तुमच्या आंगांत नाहीं म्हणून मला आपण जगांत काळें तोंड करावयाला लाव-

लेंत, आपल्या बडेजावीकरितां माझ्या शिलाचा विचार मला करूं दिलात नाहीं–आपण न्याल त्या ठिकाणीं गेलों. कारण आपली इच्छा ह्मणून. मी अत्यंत अशक्त झालें आहें, माझी ही सुबक दिसणारी आंगलट अत्यंत बेगडी आहे. घरांतील काम जरी हा गडी करीत असला तरी पण त्यानें तें मनापासून करावें व कामचुकारपणा न करितां माझ्याशीं त्यानें चांगल्या प्रकारें वागावें व मला भिऊन सर्व काम त्यानें एकट्यानेंच करावें ही माझी इच्छा; म्हणून मीं त्या गड्याला माझ्या नादीं लाविलें, त्यांत तुह्मांला राग कां यावा. जसें तुमचें पोट भरण्याकरितां–मला दुसऱ्याकडे आपण पोंहचवितां व वाईट मार्गाच्या पैशांनीं आपले बडेजाव चालवितां, त्याचप्रमाणें मीं माझ्या सुखाकरितां हा धंदा केला, करीत आहें व करणार. त्यांत आपल्याला बोलण्याचें मुळींच कारण नाहीं. ” असें निश्चयात्मक करारी मुद्रेनें सांगून माझी पत्नी दुसरीकडे वळली. मीहि गप्प बसलों. कोणाही मनुष्याची अशीच स्थिती आहे. ‘ **जो दुसऱ्याचा मिंदा झाला, त्याला आपला अपमान असाच सहन केला पाहिजे**. ही रीतच आहे. हा व्यवहारच आहे.

झालें. दुसरा दिवस उजाडला, पाहतों तों घरांत माझी पत्नी नाहीं. बराच तपास केला–पत्ता नाहीं, मी बराच हळहळलों.

महाराज ! मी माझी हकीगत संपवितों. कारण पुढची हकीगत जरी रहस्यमय असली, तरीपण निष्कारण उहापोह नको. पुढें थोड्याच दिवसांनीं मला पूर्णपणें पश्चात्ताप झाला. मीं गाणगापुराला गेलों. त्या ठिकाणीं पंधरा दिवस होतों. मी माझे मागील सर्व व्यवहार विसरलों व मला अत्यंत आनंद झाला; सकाळच्या प्रहरीं मोठ्या पाहांटेस उठून स्नान झाल्यावर श्रीदत्ताच्या समोर मीं बसत असें व केलेलें सर्व पाप त्याला सांगून “ देवा, मला मुक्त कर ” ह्मणून भिक्षा मागत असें. असें होतां होतां एके दिवशीं मला गोड स्वप्न पडलें. त्यांत श्रीदत्तगुरूनीं माझ्या स्वप्नांत येऊन, ह्या ठिकाणीं न राहण्याबद्दल मला आज्ञा केली व भुवनगडावर जाण्याला सांगितलें,

दुसऱ्या दिवशीं श्रीदत्तगुरूच्या पायांवर मस्तक ठेवून या ठिकाणीं यावयास निघालों. महाराज ! गाणगापूर सोडलें मात्र, आणि पाहतों तों काय–माझा चेहरा सोडून सर्वांग पापानें परिपूर्णपणें भरलेलें, सर्व आंगाला लहान लहान फोडीं येऊन, त्यांतून लस बाहेर येऊं लागली. पुन्हां वाटलें–परत गाणगापुराला जावें. पण मनांत विचार केला, ज्याअर्थीं गुरुमहाराजांनीं आज्ञा केली आहे कीं, "भुवनगडावरच जा" त्या अर्थीं परत जाणें अयोग्य. काय होईल तें होवो.

मीं भ्यालों; हें माझ्या अंगावर काय उठलें, हें जाईल कसें ? पण मीं त्या श्रीदत्त–गुरूवर एकनिष्ठा ठेविली, व त्यांचेंच नांव घेत ह्या ठिकाणीं आलों. रोज सकाळीं या थंड पाण्याच्या तळींत स्नान करितों व ह्या गुहेंत राहतों. माझ्या आंगांतील दुर्गंधीचा त्रास इतरांना पोहचूं नये ह्मणून सर्व दिवस ह्या गुहेंत राहतों व रात्रीं बाहेर पडतों; रोज सकाळीं नित्यनेमानें ह्या तळींतील पाणी पितों व त्याच पाण्यावर मीं दोन वर्षें आहें. दोन महिन्यापूर्वीं माझ्या स्वप्नांत श्रीशंकराची पिंडी दिसली व त्या पिंडीपासून एक वृद्ध महात्मा उत्पन्न होऊन त्यानें मला धीर दिला. तो ह्मणाला, तूं कांहीं काळजी करूं नकोस; तूं रोगमुक्त होण्याला मी श्रीरामचंद्राला येथें धाडीन. तुझें हें कृष्ट जाण्याला तुला सतत गरम पाण्याचें स्नान पाहिजे; आणि तें गरम पाणी तुला श्रीरामच देतील. श्रीरामाशिवाय ही गोष्ट दुसरा कोणीही करणार नाहीं." इतकें सांगून श्रीशंकर–होय श्रीशंकरच ते–अंतर्धान पावले. त्या दिवसापासून मी आपली वाट पाहात आहें. आतां आपण मला रोगमुक्त करा. मला रोज गरमपाण्याचें स्नान पाहिजे व तें आपण द्याल अशी खात्री आहे. माझें पूर्वींचें पाप आपण मनांत आणूं नका. माझी ही स्थिति पहा आणि कींव करा."

श्रीरामचंद्रानीं ही हकीगत ऐकली–त्यांना अत्यंत वाईट वाटलें. एका सद्गुणी स्त्रीच्या जीविताची माती करणारा हा दुष्ट–ह्याच्या समोर

एक क्षणभरही उभें राहूं नये, म्हणूनच कीं काय सीतादेवी चार पावलें मागें सरली. लक्ष्मणालाही जरासा संतापच आला होता. पण येऊन उपयोग काय ? श्रीरामचंद्रजींच्या पुढें बोलण्याची व त्यांच्या विरुद्ध वागण्याची त्यांना संवयच नव्हती. असो.

शेवटीं रामचंद्रजी म्हणाले–असो, झालें तें झालें. आपण एका स्त्रीच्या शरीराची विटंबना करणारे व तिच्या शरीराची माती करणारे, तिच्या माहेरच्या सर्व मंडळींना रौरवांत पाडणारे व आपल्या पूर्वजांना नरकांत लोटणारे अधम चांडाळ आहांत, ह्मणून–मी तुमचा द्वेष करीत नाहीं. पण आज मीं इतकेंच करितों कीं, ह्या ठिकाणीं अशी एक वज्रलेप देणगी देऊन ठेवितों कीं, तिची पूर्वपिठिका ज्या ज्या ठिकाणीं सांगितली जाईल, त्या त्या ठिकाणीं हें तुमचें पाप बाहेर पडलें पाहिजे, आणि तें ऐकून लोकांच्या आंगावर शहारे आले पाहिजेत. जगांत पैसा ह्मणजे परब्रह्म मानणें आणि त्यामुळें अब्रूचें सुद्धां मातेरें करणें ही गोष्ट अत्यंत अनुचित आहे. आपली वागणूक, आपला व्यवहार हें सर्व लक्षांत आणून आपणाला मृत्यु शिवणार नाहीं. ह्याच घाणींत आपण हजारों वर्षें राहिलें पाहिजे. असो. श्रीदत्तगुरूचा निरोप व श्रीशंकराची आज्ञा ह्मणून मीं आज आपणाला गरमपाणी देत आहें. त्यांत स्नान करा व रोगमुक्त व्हा.

इतकें बोलून श्रीरामचंद्रानीं आपलें धनुष्य हातांत घेतलें व बाण लावला. सपाटीपासून भुवनगड उंच असल्यामुळें, त्यांनीं जो वरून बाण भूमींत सोडला, तो खालीं सपाटीवरील असलेल्या श्रीशंकराच्या पिंडीपासून सरासरी पन्नास पावलावर पडला. त्याच ठिकाणीं भूमींतून गरम पाण्याचा स्रोत एकदम वर आला. लगेच श्रीरामचंद्रानीं त्याला त्या ठिकाणीं राहण्याची आज्ञा केली. व आज्ञा करतांना त्यांनीं त्याला विचारलें कीं; तुझें नांव काय ? त्यावेळीं त्या दुर्दैवी प्राण्याला–आपण रोगमुक्त होणार ह्मणून आनंद झाला होता. त्याची मुद्रा खिन्न दिसत होती. त्यानें आपलें नांव सांगण्याला सुरवात केली. तो म्हणाला–माझें गाणगाउ-

राला जाण्यापूर्वी असलेलें नांव बदलून सांप्रत मीं माझें नांव " **किल्मीषपाद** " असें धारण केलें आहे. ह्या नांवानें जर मीं प्रसिद्ध झालों--तर हें माझें उदाहरण सर्व लोकांना कळेल, व त्यापासून थोडासा तरी फायदा होईल. " " अशी जर तुमची इच्छा असेल तर **ज्या ज्या वेळीं ह्या गरम पाण्याचा वृत्तांत सांगण्याची पाळी येईल त्या त्या वेळीं त्या त्या परिस्थितीला अनुरूप अशीच एखाद्या गोष्टीची रचना करून सांगणारानें सांगावी** असें मी इच्छितों. फक्त " किल्मीषपाद " हें नांव व हें नांव ज्या वेळीं उच्चारलें जाईल **त्यावेळीं चाललेले वाईट व्यवहार**, त्या व्यवहाराचा तुमच्या नांवाशीं संबंध जोडून गोष्ट तयार करावी व **तिचा प्रसार करून**, दुनियेंतील पाप दूर करण्याचा प्रयत्न करावा अशी माझी इच्छा आहे. किल्मिषपाद, आपण जा. ह्या उंच जागेवर न बसतां खालींच राहण्याला जा, जवळ असलेल्या श्रीशंकराची आराधना करा व त्याच्यावर रोज गरम पाण्याची धार धरा. पण ज्या पाण्यांत तुम्हीं स्नान कराल त्या पाण्यानें श्रीशंकराला स्नान घालूं नका. मीं तुम्हांला--फक्त श्रीशंकराच्या स्नानाकरितां म्हणून दुसरा एक गरम पाण्याचा झरा देतों. " असें म्हणून त्यांनीं पहिल्या झऱ्याजवळच एक बाण सोडला व दुसरा गरम पाण्याचा झरा त्या ठिकाणीं उत्पन्न केला. लगेच सीतेकडे वळून श्रीरामचंद्र ह्मणाले, ऐकलीस, ह्या **किल्मिषपादाची** हकीगत ऐकलीस. ही याची हकीगत ऐकून अंगावर शहारे येणार नाहींत असा कोणीही जिवंत प्राणी या भूतलावर नसेल. **ह्या सत्ययुगांत असें हें एकच उदाहरण असलें पाहिजे.** पण पुढें कलियुगांत अशा तऱ्हेचीं उदाहरणें केक सांपडतील, त्यावेळीं माझ्या सारखा कोणीही येऊन--त्यांच्या पापावर दया करून, त्या पापापासून त्यांचीं सुटका करणार नाहीं. कारण तें कलियुग होईल. हें सत्ययुग आहे व कलीला या सत्ययुगांत थारा नसल्यामुळें हा दुर्दैवी प्राणी जास्त गुंतत जाण्याच्या ऐवजीं आज तरला, इतकेंच

नव्हे तर ह्याची प्रसिद्धि झाली व होईलही. पाहा, विचार कर, ह्या द्रव्यामुळें हा कोणत्या दशेला पोंचला; पुढें कलीचें ज्यावेळीं साम्राज्य होईल त्यावेळीं अशा तऱ्हेचे अनर्थ कैक होतील. असो." लगेच किल्मिषपादाकडे वळून श्रीरामचंद्रजी ह्मणाले, "आपण ह्या पाण्यानें स्नान केलेंत कीं आपलें सर्वांग पूर्ववत् होईल; आह्मीं आतां आपली पुढें जाण्याची परवानगी घेतों." इतकें ह्मणून श्रीरामचंद्रजी आपल्या पत्नी व बंधू समवेत निघाले, ते ज्यावेळीं निघाले त्यावेळीं किल्मिषपादानें त्या तिघांच्या चरणांवर आपलें मस्तक ठेविलें व आज आपला उद्धार झाला अशा भावनेनें त्यानें एकवार सहानुभूतीनें त्यांच्याकडे पाहिलें. श्रीरामचंद्र मार्गस्थ झाले. किल्मिषपाद लगेच खालील सपाटीवर येऊन राहूं लागला. त्या गरम पाण्याच्या स्नानानें व श्रीशंकराच्या आराधनेनें तो रोगमुक्त होऊन, पुढें लवकरच तो "**किल्मिषपाद**" या नांवानें प्रसिद्धीस आला.

वाचकहो—ज्या दैविक चमत्कारानें माझें खेडें माझी जन्मभूमी—आज प्रसिद्ध आहे त्या दैविक चमत्काराची कहाणी मी आपल्याला सांगितली. ती सांगतांना चालू **परिस्थितीला मी कवटाळलें** आहे. किल्मिषपाद ऋषीची कहाणी आपल्यापुढें मांडतांना मीं "**हल्लींच्या युगांत होणाऱ्या पापांत महत्वाचें** व जें **पाप सर्व पापांत श्रेष्ट आहे**" त्याचें चित्र आपल्यापुढें ठेविलें आहे. हें चित्र ठेवतांना वाचक दोष देतील ह्याची पर्वा केली नाहीं, सत्ययुगांत ही गोष्ट घडणें शक्य नाहीं हा वाचकांचा वज्रलेप शिक्का, मी सहन करण्याचें धाडस केलें आहे. कदाचित् कांहीं वाचक असेंही ह्मणतील कीं, रामाच्या काळांत नोकरीकरितां कोणीही बाहेर जात नव्हते. पण त्याला एकच उत्तर कीं, लेखक व वाचक ही जोडी **रामकाळाला प्रत्यक्ष पारखी होती**. सबब, त्याचा विस्तार न होणेंच श्रेयस्कर.

सध्यांची—चालू काळाची—आजची परिस्थिति प्रत्यक्ष पहा. जा. वाचकहो, जा, रत्नागिरी जिल्ह्यांत संगमेश्वर ह्मणून एक तालुका आहे,

ज्या ठिकाणीं, संभाजीला पकडण्यांत आलें तेंच संगमेश्वर हें होय. ह्या संगमेश्वरापासून तीन कोशावर एक लहानसें खेडें " राजवाडी " ह्मणून प्रसिद्ध आहे. त्या राजवाडींत, श्रीशंकराचें देवालय आहे. त्या देवालयापासून पंचवीस पावलावर **गरम पाण्याचीं तळीं** आज आहेत. ही हकीगत काल्पनीक नसून साक्षात् आहे. सत्ययुगांतील गोष्ट नव्हे, तर कलियुगांतील साक्षात् दृष्टांत आहे. ह्या पाण्याचा चमत्कार असा आहे कीं, **वाटेल तेवढें गरम करितां येतें** व हवे तितकें कोमट करतां येतें. भरचैत्रांत कमी होत नाहीं. कीं ऐन पावसाळ्यांत वाढत नाहीं. कलियुगांत त्या पाण्याचे व श्रीशंकराच्या साक्षात्काराचे अनेक दाखले केकांनीं पाहिले आहेत, कैक पाहात आहेत व कैक पाहातील. ते सर्व मीं न सांगतां फक्त एकच सांगतों कीं, जे वरील गरम पाण्याचें तलाव, पाऊस पडो वा न पडो; जें आपलें सदोदित भरपूर भरलेलें व वाहात असलेलें असें अचल रामतीर्थांचें आज पाहाणाराला साक्षात् वाहातें पाणी दिसत असून, त्या पाण्याचा थोड्या वर्षांपूर्वी लेखकानें साक्षात् चमत्कार पाहिलेला आहे. चमत्कारच तो ! तो चमत्कार प्रत्यक्ष पाहिलेला असल्यामुळें अधिक आश्चर्य वाटतें. राजवाडींत राहणारीं सर्व माणसें त्या तळ्यावर स्नानाला रोज येत असतात. त्यांतही कांहीं अशीं आहेत कीं, तीं जवळच असलेल्या नदीवर स्नानाला जातील, पण त्या तळ्यावर—त्या रामतीर्थावर स्नान करणार नाहींत असो. नेहमींप्रमाणें त्या तळ्यावर गांवांतील मंडळी स्नानाला सकाळीं आली, पण पाहातात तों ' **तळें सुकें खणखणीत.** ' पाण्याचा लवलेश आंत नाहीं. सर्व घाबरले. पाणी जाण्याचें कारण काय तें कळेना, कांहीं तरी भ्रष्टाचार झालेला असला पाहिजे हें खास ! पण तो कळणार कसा ? ह्मणून गांवांतील सर्व लोकांनीं श्रीसोमेश्वराच्या देवळांत जाऊन त्याच्यापुढें एक नारळ ठेविला व " कोणाच्याही हातून कांहीही चूक होवो पण क्षमा कर व तळ्यांत पूर्ववत् पाणी येऊं दे. " काय चमत्कार ! प्रार्थना करण्याची खोटी !! लगेच पूर्ववत् पाणी आलें व सर्वांना आनंद झाला.

हा चमत्कार ऐकून-एका बाईनें आपण होऊन कबूल केलें कीं, " आज मला चौथा दिवस होता, नदीवर जाण्याला भीति वाटली ह्मणून मीं तळ्यावर जाऊन न्हाल्यें " ती बाई पुढें पंधरा दिवसांत मरण पावली.

केवढा साक्षात्कार आहे बरें ? हा तलाव जर एकाद्या शहरांत असता. तर त्याची केवढी प्रसिद्धि झाली असती. कैक लोक स्नानाला आले असते.

असो. पण सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, गांवांत त्या देवस्थानाला महत्व नाहीं, देऊळ प्रेक्षणीय असून, जवळ गरम पाण्याचें अचल रामतीर्थ असून, त्याची बांधणी वज्रलेप असून-त्या देवळाच्या डागडुजीला, त्याचे उत्सव साजरे करण्याला गांवांतलि कांहीं भाग इनाम असून त्या देवळाकडे कोणी लक्ष देत नाहीं. गांवांतील लोक तीर्थाला ह्मणून, काशी त्र्यंबकेश्वर करीत असतात. पंढरपूरच्या व नाशीकच्या देवस्थानाला भेटावयाला जातात; पण प्रत्यक्ष घरांत **काशी-विश्वेश्वर** असून त्याचें दर्शन मात्र त्यांच्या नशिबांत नाहीं ! कोण ही भिकार स्थिति ! ! अशा स्थितीनें खेडींपाडीं उर्जित दशेला येणार कशीं ? देव माणसांना कंटाळले, खेडीं ओस पडत चाललीं. ह्याच खेड्यांतून आमच्या पूर्वीच्या दोन पिढ्या मजेंत राहून आपल्या कारकीर्दींत पंधरावीस माणसांचा उदरनिर्वाह करीत असत. जमिनीनीं पिकें सोडिलीं याचें कारण, आह्मांला खेड्यांत राहणें त्या जमिनींत कसणें त्या परिचयाच्या देवळांत जाणें, वगैरे गोष्टी कंटाळवाण्या वाटूं लागल्या. त्याच गांवांत आमची पोटें आज भरत नसलीं तर आश्चर्य काय ! महाराज आश्चर्य नाहीं. जमिनी पिकें देत नाहींत ह्मणून त्यांना दोष कां देतां ? देवाच्या नांवानें हाका मारून वक्षस्थळें कां बडवितां ? देवाची एखादी चांदीची अगर सोन्याची प्रतिमा असली, तर ती एकाद्या म्लेंच्छाच्या घरीं गहाण ठेवून, आपली पोटें जाळण्याला, तुह्मांला मुळींच दिक्कत वाटत नाहीं ? काय म्हणावें ह्या कृतीला !

श्री सोमेश्वराच्या देवस्थानाला सरकारकडून कांहीं भाग इनाम आहे असें एके ठिकाणीं सांगितलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्या देवस्थानाची जाज्वल्यता मनाला पटून—सरकाराकडून—पूजा करण्याप्रीत्यर्थ वर्षाचे तेरा रुपये अद्यापपर्यंत मिळत आहेत, असें मला वाटतें. पूर्वी, कोणीतरी बडा राजदरबारी महात्मा म्हणा अगर प्रत्यक्ष राजा ह्मणा, भुवनगडावर राहात असावा असें वाटतें, कारण त्या वेळचीं राजचिन्हें अद्याप प्रत्यक्ष दिसत आहेत, त्या राजानें—ह्या देवळाची सर्व व्यवस्था, आपल्या कर्तबगारीनें पुढें आलेल्या एका घराण्याकडे सोंपवली होती. त्यांनीं ती अद्यापपर्यंत चांगल्या प्रकारें चालविली. पण दुर्दैवाच्या फेऱ्यापुढें राजा—प्रजा, कोणीच टिकाव धरीत नाहींत, ह्याच तत्वाला अनुसरून त्या घराण्याची पूर्वीची श्रीमंती, पूर्वीचा लौकिक वगैरे हळु हळु दुसऱ्याच्या घरांत जाऊं लागला. अस्थीर लक्ष्मी, केव्हांही स्थीर राहणें शक्य नाहीं हा तिच्या नांवाला लागलेला कलंक ती थोडाच पुसून टाकणार आहे; अर्थात् नाहीं, आणि ह्मणूनच तिनें हळुहळु आपला पाय बाहेर काढण्याला प्रारंभ केला; प्रत्यक्ष परमेश्वराच्या मनांत जरी एकादा मनुष्य बळी घेण्याचें आलें तरी तो स्वतःवरचा बोजा केव्हांही दुसऱ्याच्या पदरांत टाकतो. आपल्याला अपेश नको हीच त्याची इच्छा असते.

कोणीही मनुष्य मृत्युमुखीं पडला कीं, तो कां पडला हा प्रश्न उद्भवतो व त्याचें कारण शोधून "**तो अमक्या अमक्या रोगानें बिचारा मेला हो!**" असें आपण गातों; ह्यांतच आपण चूक करितों, ही कल्पनाच आपणांला शिवत नाहीं.

हा नियम जर आपण आपल्या पूर्व वैभवाकडे लावला व तें वैभव, तें भाग्य, ती गजांत लक्ष्मी आज कोठें आहे हें शोधूं लागलों, तर माझ्यामतें खालील उत्तर मिळेल. तें उत्तर हें कीं, "**श्रद्धेचा अभाव.**" राजवाडी गावांत नांवाजलेलीं, श्रीमंतीनें नटलेलीं, लौकिकानें दुमदुमलेलीं व आल्यागेल्याचा परामर्ष करणारीं बरींच घराणीं होतीं; त्यांच्या, त्या त्या कुटुंबाच्या पूर्वजांच्या, जर

पिढ्या पाहिल्या व त्यांच्या भोळ्या भावीक गुणांचें जर वर्णन ऐकलें तर एकच गोष्ट मनाला पटते. ती गोष्ट कोणती, तर **परमेश्वरावर एकनिष्ठ श्रद्धा.** या श्रद्धेच्या योगानें त्यांच्या उत्पन्नापैकीं बराचसा भाग देवकार्यांत खर्च होत असे व त्या योगानें देवकार्याला पुष्टि मिळून नमुनेदार उत्सव साजरे होत असत. पण आज पहा! महाराज! आपल्या घरचीं उणीं काढण्याचा व तीं चार चौघांत मांडण्याचा प्रसंग आला म्हणजे डोळ्यांत अश्रू कसे उभे राहतात ह्याची कल्पना प्रत्येकाला थोडीबहुत आहेच! माझ्या "जन्मभूमीची" व त्या ठिकाणीं असलेल्या माझ्या "स्वयंभू देवस्थानाची" आज गांवांतील आह्मां मंडळीकडून कशी सेवा होते त्याची कल्पना केली असतां आसवांनीं डोळे भरून येतात!

त्या देवस्थानाची व्यवस्था पाहण्याचें ज्यांच्याकडे काम आहे त्या मंडळीची गृहस्थिति आज समाधानकारक नसल्याकारणानें त्यांना उत्सवांत भाग घेण्याला उल्हास येत नाहीं. केवळ वडिलो-पार्जित चालू परंपरा आहे ह्मणून उत्साह पार पाडावयाचे हीच भावना आज जिवंत आहे. ज्यांच्याकडे ही कामगिरी सोंपविलेली आहे त्यानींच ती पार पाडिली पाहिजे, ही भावना गांवांतील मंड-ळीच्या मनांत वावरत असल्यामुळें ती सर्व मंडळी तिकडे मुळींच लक्ष देत नाहींत.

महाशिवरात्रीला ह्या देवळांत मोठी यात्रा भरत असे; व थोड्या फार प्रमाणानें आजही भरत आहे. शिवरात्रीचा उत्सव तीन दिवस होतो, त्या तीन दिवसांत कीर्तन, नाटक, वगैरे करण्याचा प्रघात होता. तो प्रघात हल्लीं बंद पडून रुढी म्हणून जिवंत आहे. नाटक तर मला वाटतें-गेल्या पांच सहा वर्षांत झालेंच नाहीं. कीर्तन मात्र दर वर्षाला होतें. पण त्यावेळीं श्रोतेजन ह्मणाल तर पांच दहा वृद्ध मंडळी आणि हरदासाचे दोन जोडीदार. कारण काय तर **तरुण मंडळीचा देवावरील उडालेला विश्वास.**

हा विश्वास उडाल्यामुळे, आज देवकार्य मागें पडत चाललें आहे. ही गोष्ट अनुचित् आहे. ह्या गोष्टीसारखी अत्यंत लाजीरवाणी दुसरी गोष्टच नांहीं. **देवावरील विश्वास हीच श्रीमंती होय.** आमची पूर्व श्रीमंती केवळ देव-श्रद्धेनें होती. पण आज तीही नाहीं ! गांवांत व आजूबाजूला घरंदाज लोक राहतात, गांवांतील लोकांना जर गांवातच असलेल्या देवाची-प्रखर दैवताची सेवा होत नाहीं, तर देवाचे मानकरी ह्मणून मिरविणाऱ्या घरंदाजांनीं आपलीं घरें दारें सोडावीं व गांवांबाहेर वास्तव्य करावें. त्रिपूर लावण्याचा ह्मणे पहिला मान अमक्या अमक्याचा ! पण घरांत देवाची सेवा करणारा, व त्याचा, त्या मानाचा मान राखणारा, आज कोणी महात्मा दिसतो आहे काय ?

महाशिवरात्रीला पहिला सोमेश्वरावर लघुरुद्र होतो. हा लघुरुद्र "मानकरी" आमचा असें मानतात. पण त्यांना मीं असें विचारितों कीं, काय हो-ज्या मनाच्या मोकळेपणानें तुह्मीं "सोमेश्वरावर आमचा पहिला लघुरुद्र होतो" असें ह्मणतां व पहिला मान प्राप्त झाल्याबद्दल आनंद दाखवितां, त्याच देवाला तुम्हीं कोणत्या तऱ्हेनें वागवता बरें ? आपली पोटाची खळगी एकवार उपाशीं राहिली तरी चालेल पण आपल्या वार्षीक उत्पन्नांतील वेतनांत हात ढिला करून आपल्या पोटाच्या दामटीला वर आणण्याकरितां, ठरलेल्या देवकार्यांत उणीव करणें हें महत्पाप नाहीं काय ? आणि हेंच कारण आपल्या घरांतून लक्ष्मी पळण्याचें आहे अशी तुमची मनोदेवता तुह्मांला ग्वाही देत टोंचून टोंचून सांगत नाहीं काय ?

लघुरुद्र करण्याचा पहिला मान एका मानकऱ्याचा झाल्यावर दुसरा लघुरुद्र दुसऱ्या मानकऱ्याचा आहे. हे दोन लघुरुद्र झाल्याशिवाय इतर कोणाचाही व्हावयाचा नाहीं हा नियम आहे. ही रीत आहे. हा पूर्वापार चालू रस्ता आहे. ह्याबद्दल उभयतांनाही मोठा अभिमान वाटतो, आणि वाटणें हेंही रास्त आहे. पण मीं त्यांना

प्रेमानें विचारतों कीं, हजारों रुपये तुह्मीं कमावलेत ह्यापुढें कमवाल, पण त्यांपैकीं देवाप्रीत्यर्थ तुमचे किती पैसे खर्च होतात. मला लिहिण्याला अत्यंत दिलगिरी वाटते कीं, महाशिवरात्रीला होणारा वार्षिक लघुरुद्र व त्याप्रीत्यर्थ होणारा खर्च तोसुद्धां प्रत्येकाकडून वेळीं येत नाहीं हें मी खात्रीनें सांगतों. ह्याचा परिणाम आज प्रत्यक्ष पहा.- घरांत असलेल्या पुरुषांचा घोळका गांवांतून पोट भरण्याकरितां निघून आज मुंबईत वावरत आहे. गजांत लक्ष्मीचें वैभव लयाला जावून-त्या ठिकाणीं, रंकाचें वैभव नांदत आहे. असें कां ? तर त्याला एकच उत्तर, तें कोणतें तर " **गांवांतील प्रखर देवस्थानावर-श्रद्धेचा अभाव.** " दुर्दैवाच्या प्रखर श्रीमंतीनें जरी आज पोटासाठीं, ती श्रीमंती घालविण्याकरितां, आपण परदेशीं आलों आहोंत तरीपण, " देवावर अविश्वास व त्याची हेटाळणी " ह्यांच्या योगानें आज जरी पूर्णपणें आपण रंकाचे वैभव भोगित नसलों तरीपण-ह्या अशा बुद्धीनें " **दुर्दैवाची प्रखर श्रीमंती**. आपणांला मिळेल हें पूर्णपणें लक्षांत ठेवा. "

त्याच प्रमाणें माझ्या देश-बंधूनों, लक्षपूर्वक पहा. पूर्वीचें वैभव आज नाहीं. ह्याचें कारण एकच; कोणतें तर " **प्रसंगी देवाला हांक मारणें.** " ही हांक मारतांना देव आह्माला पावतो ही गोष्ट खरी, पण ही आमची कर्तबगारी नसून आमच्या पूर्वजांची पुण्याई. आहे. आज खेड्यांत हाताच्या बोटावर मोजण्याइतकी पुरुष मंडळी आहेत. ती पुरुषमंडळी सुद्धां कोण ह्मणाल तर " ज्यांनां बाहेर जाऊन, श्रम करतां येणार नाहींत अशी वृद्ध मंडळी. " प्रत्येक भावी तरूण पिढी गावांत पोटापुरती जमीन असून सुद्धां, निव्वळ मजेंत राहण्याकरितां आपल्या पत्नीसह गांवाबाहेर आहेत. त्यांच्या योगानें प्रत्येक घरांत सायंकाळीं वात लावण्याला सधवा गृहलक्ष्मी मिळणें फारच कठीण झालें आहे. बाहेर असलेली मंडळी परक्या गांवीं राहून "परका गांव माझा" असें आचरणानें सिद्ध करीत

आहेत. वार्षिक उत्सवाला आपल्या देवस्थानाजवळ येऊन त्याची सेवा करणें, दर्शन घेणें, हें तर बाजूलाच. पण पांच पांच, सहा सहा वर्षें जन्मभूमीला दर्शन नाहीं, हीच काय आमची देवश्रद्धा. श्रद्धा ही कीं ज्याला देवाची रात्रंदिवस चिंता. श्रद्धा ही कीं, ज्याला परमेश्वराचा विश्वास, श्रद्धा ही कीं, जो रात्रंदिवस त्याच्याच सेवेंत गुंग. माझ्या बंधूनों, ज्या अभिमानानें आह्मीं इतर आपल्या बांधवांना देवस्थानची महती सांगतों तोच अभिमान आपल्या मनांत निरंतर बाळगा. तुम्हीं कोठेंही असा, पण वर्षांतून एकदां आपल्या जन्मभूमीला या व तुमच्या पवित्र देवस्थानाच्या वार्षिक उत्सवाला शोभा आणा व हातभार लावा; परमेश्वरावर अढळ विश्वास ठेविलेत तर, **अढळ विश्वास ठेविणाऱ्या ध्रुव बाळाइतकें** तुमचें नांव अजरामर होईल व त्याचें सर्व श्रेय आपल्याला मिळेल. पैशाच्या पाठीमागें लागून देवाला दूर लोटूं नका, " **पैसा हा परमेश्वर नसून परमेश्वर हाच पैसा होय.** " पण आपल्या शुद्ध आचरणानें आपण तो परमेश्वर आपलासा करून पैशाला दास बनविलें पाहिजे. ही अक्कल परदेशांत नसून तुमच्या गांवांतील देवस्थानाजवळ आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून निरंतर आपल्या जन्मभूमीचें दैविक रहस्य रहस्यमय करा ह्मणजे आपण सुखी व्हाल.

वाचकहो, ही किल्मिषपादाची कहाणी संपली, राजवाडी गांवांतील " राजतीर्थाचा " इतिहास आपण वाचलेत. त्या ठिकाणीं असलेल्या देवस्थानाची प्रखर जाज्वल्यता, आपण कदाचित् जाणलेत असाल. ह्या देवस्थानाची कांहींतरी सेवा करावी व त्या देवस्थानाची प्रत्येकाला ओळख होऊन " **प्रत्येकाची धार्मिक व दैविक भावना वाढावी** " हीच इच्छा " **माझी जन्मभूमी** " रेखाटण्यांत आहे.

त्याच ' राजवाडी गांवांत माझा जन्म झाला. अशा पवित्र, रामतीर्थांच्या ठिकाणीं विधात्यानें मला जन्माला घातलें म्हणून मीं त्याचा अत्यंत आभारी आहें. शेवटीं इतकेंच सांगणें इष्ट आहे कीं, प्रत्येकानें शक्यतर एकवार ' **राजवाडीला**' जाऊन, त्या पवित्र देवस्थानाची भेट घ्यावी व प्रत्यक्ष हकीगत पाहून तृप्त व्हावें.

परमेश्वरस्वरूप जनतेला ही विनंती करून प्रत्येकाला आप आपली " जन्मभूमी " आदरणीय वाटो व तिच्यावर प्रेम वसो. हीच इच्छा प्रदर्शित करून माझ्या वंदनीय " जन्मभूमीला " मीं वंदन करितों.

**हानि कुसंग सुसंगति लाइ ।**
**लोकहु बिदित सब काहु ॥ १ ॥**

—तुलसीदास.

REFBK-0001957
REFBK-0001957

समाप्त.

का. क्र. १९५७